# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०६/२०१६.

**१) गाईला केबलचे वायर बांधुन फाशी लावुन मारल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २१/०६/०१६ चे १०.३० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी खुशाल बालाजी गेडाम वय ४५ वर्ष, रा. हिवरा ता. मौदा जि. नागपुर यांनी आपली लाल रंगांची गाय चारण्यास हत्तीडोई शेत शिवार डॉ. तुरस्करचे बंगल्याजवळील परीसर येथे स्वत:चे शेतात सोडली व बॅकेचे कामानिमीत्त भंडारा येथे आला. यातील आरोपितांनी संगनमत करून फिर्यादीच्या गाईला केबलचे वायर बांधुन फाशी लावुन मारले. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ ,३४ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि .उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहनाच्या धडकेने महीला जखमी. :—**

दिनांक २२/०६/२०१६ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादि श्रीमती प्रभाबाई रामा कडव वय ६० वर्ष, रा. बेला हि बस्टॉप वरून पायी पायी सरकारी दवाखाना भंडारा येथे जात असतांना अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला धडक मारून जखमी केले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७, भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) शुल्लक कारणावरून भांडण करून दगडाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक २२/०६/२०१६ चे १७.३०.वा. दरम्यान फिर्यादी सौ. सुधा प्रकाश गजभीये वय ४५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड भंडारा याने घरासमोर आपले गेटचे पुढे ठेवलेला बोरवेलचे सामान उचलुन बाजुला ठेवा असे आरोपीला बोलला असता यातील आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करून फिर्यादीचा मुलगा राहुल प्रकाश गजभिये याचे डोक्यावर,चेह—यावर दगडाने मारून जखमी केले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायदयाखाली कार्यवाही:—

दिनाक २२/६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४९ प्रकरणाची नोंद करण्यात आली असुन त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्यांवर ०३ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ७ केसेस व इतर वाहनांवरती १३९ केसेस करण्यात आलेले आहेत.

(के. एच. धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनि कमांक ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०६/२०१६

**१) दारूडया वाहन चालकावर कार्यवाही:—**

अ) दिनांक २२/६/२०१६ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत चालवितांना बसस्थाक भंडारा येथे मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा बडवाईक वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

ब) दिनांक २२/६/२०१६ चे १९.१०.वा.दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत चालवितांना पोस्ट ऑफिस चौक भंडारा येथे मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा भुते वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२)अवैध दारू /जुगार अडयावर धाडी**

दिनांक २२/६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलींसानी पोस्टे भंडारा ,मोहाडी ,कारधा ,सिहोरा,पवनी,येथील परीसरातील अवैध दारू/ जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ७ गुन्हे दाखल करून आरोपींताच्या ताब्यातुन ५७ लिटर ५४० मि.ली.देशी व हातभट्टी दारू की. ३४००/—रू व जुगारातुन २०१०/रू.असा एकुण कि.५४१० /रू चा माल जप्त करण्यात आला

(के. एच. धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनि क्रमांक ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.